दै.रजि.नं.
दाखल ता.१०-०२-२०२६

Exh 1/c

क्रि. किर. अर्ज. नं. 20 /२०२६

मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल
यांचे न्यायालयात....

| | | |
|---|---|---|
| इकबाल जमिर पठाण<br>व.व. २५, धंदा :- व्यापार व वाहतूक,<br>रा. व्हन्नूर रोड, माळवाडी,कोगिल बु ।।,<br>ता. करवीर, जि. कोल्हापूर. | } | अर्जदार |
| वि | | |
| महाराष्ट सरकार<br>(कागल पोलिस स्टेशन) | } | वि. प. |

orderIssue notice to th

बी एन एस एस.कलम ५०३ प्रमाणे
मुददेमाल मागणी अर्ज....
कागल पो.स्टे. गु.र.नं. ३१ /२०२६
गुन्हा- म.प्रा.सं.का.क.५(अ),(ब) ९
प्रा.कु.वा.प्र.का.क.११(१)
मो.वा.का.क.६६/१९२.बी एन एस ३(५)

यातील अर्जदाराचा विनंती अर्ज की,

१) यातील अर्जदार यांचे मालकीचा खालील वर्णनाचा मुददेमाल महिंद्रा बोलेरो पिक अप कागल पोलिसांनी वर नमुद गुन्हयाचे कामी अर्जदार यांचे ताबेतून दि.०५-०२-२०२६ इ. रोजी जप्त केले आहे.

२) मुददेमालाचे वर्णन :-

महिंद्रा बोलेरो पिक अप

रजिस्ट्रेशन नंबर - एम एच ०९ सी व्ही ६५५७
रजिस्ट्रेशन तारिख - ०२/११/२०१६

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

| | |
|---|---|
| मेकर्स नेम | - महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. |
| मॉडेल | - बोलेरो पिक अप |
| बॉडी टाईप | - डिलीवरी व्हॅन |
| चेसिस नंबर | - MA1ZN2GHKG1J68923 |
| इंजिन नंबर | - GHG1J45530 |
| रंग | - पांढरा |
| अंदाजे किंमत | - रु.४,००,००० /- |

३) येणेप्रमाणे वरील वर्णनाचा अर्जदार यांचे मालकीचा वर नमूद मुददेमाल कागल पोलिसांनी अर्जदार यांचे ताबेतुन जप्त केले आहे.

४) सदर मुददेमाल अर्जदार यांच्या कायदेशिर मालकीचे आहे. त्यामुळे खालिल कारणांचा विचार होवून सदर मुददेमाल वाहन यातील अर्जदार यांना परत करणेत यावा.

१) जप्त मुददेमाल वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे. त्याच्या मालकीशी इतर कोणाचाही कसलाही हक्क संबंध अगर अधिकार नाही.

२) जप्त मुददेमाल वाहन हे अर्जदार यांच्या दररोजच्या वापरातील असून त्याच्या आधारेच अर्जदार माल वाहतुकीसाठी वापरत असतात. त्यामुळे सदर वाहन कागल पोलिस स्टेशनला तसेच पडून राहिल्यास अर्जदार यांचे नुकसान होणार आहे.

३) अर्जदार यांनी सदर मुददेमालाचा वापर कोणत्याही गुन्हयाचेकामी अथवा गैरकृत्यासाठी केलेला नाही. अथवा यापुढेही करणार नाहीत. सदर मुददेमालाचा सदर गुन्हयाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

४) अर्जदार यांचे मुददेमाल वाहन हे गेल्या बऱ्याच दिवसापासून कागल पोलिस स्टेशन येथेच पडून आहे. सदर केस गुणदोषावर चालून निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे ते तेथेच पडून राहील्यास पावसाळामुळे व हवामानातील बदलामुळे तो गंजून खराब होवून जाणार आहे व विना वापरामुळे इंजिन निकामी होणार आहे. त्यामुळे अर्जदार यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच यातील

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

अर्जदार यांच्या गाडीची देखभाल करण्याची अथवा ती व्यवस्थित ठेवण्याची गरज कागल पोलिसांना नाही. त्याची देखभाल करण्याची व ती वापरण्याचा हक्क यातील अर्जदार यांना आहे. तसेच अर्जदार हे सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा मागत आहे. सदर केसच्या अंतिम निकालास अधिन राहण्याच्या अटीवर सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा यातील अर्जदार यांच्याकडे देण्यास काहीही हरकत असण्याचे कारण नाही.

५) जप्त मुददेमाल वाहन परत मिळण्याकरीता अर्जदार योग्य त्या रक्कमेचा बॉड मे. कोर्टात देणेस तयार आहेत. व मे. कोर्ट घालतील त्या अटी पाळण्यास तयार आहेत.

६) जप्त मुददेमाल वाहन अर्जदार यांना बॉडवर परत दिल्यास ते त्याचा वापर कोणत्याही गैरकृत्यासाठी करणार नाहीत. अगर थर्ड पाटीला विकणार नाहीत अगर त्याच्यात कोणताही बदल करणार नाहीत.

७) मे. कोर्ट हुकूम करतील त्यावेळी अर्जदार सदर मुददेमाल वाहन मे. कोर्टात हजर करण्यास तयार आहेत.

८) अशा प्रकारचा मुददेमाल मागणी अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल अथवा प्रलंबित नाही.

९) सदर वाहनाचे रजिस्टशन प्रमाणपत्रावर अर्जदार यांचे पत्यामध्ये ता.कागल असे टायपिंगच्या चुकीमुळे पडले आहे. कागल तालुक्यामध्ये कोगिल बु.।। हे गाव नसून ते करवीर तालुक्यामध्येच आहे.

तरी वरील सर्व कारणांचा विचार होवून सदर मुददेमाल वाहन अर्जदार यांना योग्य त्या रक्कमेचा बॉड घेवून परत करणेत यावे ही नम्र विनंती.

कागल.
ता. १०/०२/२०२६

मे. जा. व्हावे.

EJP

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## प्रतिज्ञा

मी अर्जदार इकबाल जमिर पठाण सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु. कागल.ता. ता. १०/०२/२०२६ EJP

## ॲफिडेव्हीट

मी अर्जदार इकबाल जमिर पठाण व.व.२५, धंदा :- व्यापार व वाहतूक, रा. व्हन्नूर रोड,माळवाडी, कोगिल बु.।।. ता. करवीर, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट. आज मु. कागल. EJP

ता. १०/०२/२०२६
मी ॲफिडेव्हीट करणार
यांना ओळखतो.
[signature]
ॲड. मिलिंद. ज. पाटील.

## प्रतिज्ञा

मी अर्जदार इकबाल जमिर पठाण सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु. कागल. EJP

ता. १०/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri. Ikabal Jamir Pathan.
Age 25 of Kagil Karveer who is
identified by Shri M.J. Patil Adv
.............whom I know personally
Dated :- 11/2/26
[signature]
Assistant Superintendent

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.17 17:29:53 +0530